**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अन्वये पुरावा.**

नि.फौ.ख.क्र. २६/२००३
सरकार विरुध्द किरण
निशाणी क्रमांक – ६०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –
माझे नांव – रमाकांत रामराव मैंद,
वय –५५ वर्षे धंदा – शेती
रा. विळेगाव, ता. अहमदपूर, जि. लातूर.

**शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री.व्ही.एस.तोरकडे**

१. पोलीसांनी मला पंचनामा करीता बोलाविले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष आरोपीच्या सहीचा नमुना घेतला नव्हता. आता मला पंचनामा दाखविला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुराची मला माहिती नाही. साक्षीदाराने पंचनाम्यावरील सही मान्य केल्यामुळे सही पुरते **निशाणी क्र. ६१** देण्यात येते. साक्षीदार आदीनाथ किसनराव डुबेवाड हे मयत आहेत ते आमचे गावातील रहिवाशी होते.

**साक्षीदार अभियोगपक्षास मदत करीत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदार हा सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २०/१२/२००३ रोजी पोलीसांनी मला व दुसरे पंच कचरु घारगीळ यांना पोलीस ठाणे अहमदपूर येथे पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी आमचे समक्ष आरोपीचा हस्ताक्षराचे सहा कागदावर सहा सहया नमुने म्हणून घेण्यात आले तसा पंचनामा करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २९९ अन्वये पुरावा असल्यामुळे उलटतपास नाही.**

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,
स्वाक्षरीत/–
**(आर.डी.वाबळे)**
अतिरीक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक – २२/०७/२०२६